# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १५/११/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१५) इतिवृत्त**

**शनिवार,** दिनांक **१५ नोव्हेंबर २००८ रोजी** स्थायी समितीची सभा, माननीय सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **"मलीक अंबर स्थायी समिती सभागृह"** येथे **दुपारी ११-५० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला उप आयुक्त(म.), नगर सचिव म्हणून उप आयुक्त(प्र.) व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
२. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
३. सौ. अल्पा विकास जैन
४. श्री. संजय रामदास जोशी
५. श्रीमती जयश्री किवळेकर
६. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
७. श्री.जावेद हसन खान
८. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
९. श्री. कचरू सोनवणे
१०. श्री. सिताराम सुरे
११. श्री. नारायण कुचे

<u>संवाद :</u>

श्री.सिताराम सुरे : भाडेतत्वावरील भुखंडाबाबत १५ पैकी १२ भूखंड धारकांचा विरोध असतांना दिनांक ३१.०३.२००८ रोजी एक ऐनवेळेचा ठराव पारीत केलेला होता. तो रद्द करणेसाठी २३ तारखेला मी पत्र दिले होते. मागील बैठकीत २१.१०.२००८ रोजी व आजच्या बैठकीतही तो विषय न ठेवण्याचे कारण काय?

मा.सभापती : मालमत्ता विभागाकडून प्रस्ताव मागविलेला आहे.

उपआयुक्त (म) : मालमत्ता विभागाकडून मागविलेला आहे. मालमत्ता अधिकारी यांना या संदर्भात विभागप्रमुखांशी चर्चा करून पुढील बैठकीत ठेवण्याच्या सूचना देण्यात येतील.

मा.सभापती : पुढील बैठकीत प्रस्ताव सादर करावा.

श्री.नारायण कुचे : चार बैठकीपूर्वी मुकूंदवाडी येथील श्री.जैस्वाल यांचे अतिक्रमण काढणेबाबत आदेशीत केले होते, मा.आयुक्तांनी अतिक्रमण काढण्याचे निर्देश दिले होते अंमलबजावणी का झाली नाही. याबाबत खुलासा व्हावा.

मा.सभापती : शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता : अतिक्रमण विभाग नुकताच माझ्याकडे आलेला असल्यामुळे याबाबतची माहिती घेवून पुढील बैठकीपुर्वी त्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.संजय जोशी : ऐतिहासीक औरंगाबाद शहरातील अमरप्रित हॉटेल ते बिड बायपास येथील रस्ता रस्ते विकास महामंडळाकडे आहे. सदरील रस्त्याबाबत सर्वच वर्तमानपत्रात त्या रस्त्याच्या दुर्देशेबाबत बातम्या प्रसिध्द होत आहेत. या रस्त्यावर प्रचंड खड्डे पडलेले आहेत, तो रस्ता एमएसआरडीसी कडून मंजूर झालेला आहे काय? प्रशासनाने खुलासा करावा.

अति.शहर अभियंताः अमरप्रित ते शहानूरमियाँ दर्गा हा २४ मिटर रूंद रस्ता असून शासनाचे आयआरडीपी मध्ये १६७ कोटीच्या निधीत अंतर्भुत आहे. या रस्त्याची निवीदा एमएसआरडीसी मार्फत एक महिन्यापुर्वी निघालेली होती आणि मुंबई येथील त्यांच्या बोर्डाकडे मंजुरीसाठी होता दिनांक १२ तारखेला बोर्डाची बैठक होती परंतु ती पुढे ढकलण्यात आली आहे.

श्री.संजय जोशी : मंजूरी मिळेपर्यंत काम सुरू होणार नाही, प्रशासनाचा यासाठी काय पर्याय आहे. त्याबाबतची तरतुद काय आहे?

अति.शहर अभियंताः स.सदस्यांची कालच याबाबत चर्चा झाली आहे, त्याअनुषंगाने आज प्रशासनातर्फे मा.आयुक्तांचे अर्धशासकीय पत्र पाठवत आहोत. सकाळी मा.महापौर यांचेशी चर्चा झालेली आहे. १८तारखेला सकाळी ११.०० वाजता MSRDC च्या अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित केलेली आहे. आज तसे पत्र त्यांना पाठविण्यात येत आहे.

श्री.संजय जोशी : MSRDC ची बैठक दर महिन्याला किंवा दोन महिन्याला होत असते, अमरप्रित ते शहानूरमियाँ दर्गा येथील रस्त्यात प्रचंड खड्डे पडलेले असून पायी चालणे नागरीकांसाठी अवघड झाले आहे. प्रशासनाला आदेशीत करावे की, येत्या चार दिवसांत खड्डे बुजविण्यांत यावेत. गेल्या दोन वर्षापासून सदरील रस्त्यांच्या पॅचवर्क बद्दल बोलत आहे. रस्ते विकास महामंडळाने रस्त्याचे काम सुरू केलेले नाही. महापालिकेचे म्हणणे आहे की, सदरील रस्ता त्यांच्या ताब्यात आहे, ते काम करत नाही. तेव्हा मनपा प्रशासनाने तात्काळ सदरील रस्त्यावर पॅचवर्क करावे. रस्ता सुरू होण्याच्या पुर्वी त्याची देखभाल करणेची जबाबदारी मनपा प्रशासनाची आहे.

अति.शहर अभियंताः मागील ५ वर्षापासून सदरील रस्ता मेंन्टेनन्सचे काम करत आहे. परंतु सदरील रस्ता आता पॅचवर्कने दुरूस्त होणार नाही, कारण की

सदरील रस्त्यावर अनेक कामामुळे उदा.ड्रेनेज लाईन शिप्टींग,पाईप लाईन शिप्टींग,पोल शिप्टींग व इतर कामामुळे सदरील रस्ता पुर्णपणे उखडलेला असल्यामुळे बेसमेंट पासून पुन:र्बांधणी करावी लागेल, जो मुळ पाया निखळला गेला असल्याने पॅचवर्क राहणार नाही.

श्री.संजय जोशी : श्री.तनवाणी साहेब महापौर असतांना सदरील रस्त्यांवर अर्थसंकल्पात तरतुद नसतांना ड्रेनेज,पाईप,पोल शिप्टींग लवकरात लवकर व्हावी यासाठी ६४ लाखांची तरतुद केली होती. सदरील रस्त्यावर तातडीने पॅचवर्क करावे, मेटल टाकण्यात यावे, सदरील रस्त्यावर सकाळी ५ वाजता प्रशासनामार्फत लाईट बंद करण्याचे आदेशित केलेले आहे.

कार्य.अभियंता (विद्युत): एमएसइबी द्वारे सकाळी लोड शेडींग केली जाते. प्रशासनाद्वारे कुठलाही आदेश देण्यात आलेला नाही.

मा.सभापती : त्या रस्त्यावरील लाईट स.६.३० पर्यन्त चालू ठेवावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: रस्त्यांचा जो प्रश्न आहे तो संपूर्ण शहराचाच प्रश्न आहे, अमरप्रित ते शहानूरमियाँ दर्गा रोडवरील खड्डे तात्पुरते लेव्हल करून दुरूस्त करण्यात यावे.

मा.सभापती : अमरप्रित ते शहानूरमियाँ दर्गा रोड बाबत तातडीने काय करता येईल प्रशासनाने खुलासा करावा.

शहर अभियंता : दोन ते तिन दिवसांत रस्ता पॅचवर्कचे काम सुरू करण्यात येईल. अंदाजपत्रक करण्याचे काम पडल्यास मा.आयुक्तांची मंजुरी लागेल.

श्री.संजय जोशी : तातडीचे कामाचे अधिकार मा.आयुक्तांना आहेत फक्त ते तातडीचे आहे काय हे ठरवावे लागेल. त्यामुळे अधिकाऱ्यांनी ते तातडीचे आहे किंवा नाही हे ठरवावे. मा.आयुक्तांनी त्यास मंजूरी द्यावी.

मा.सभापती : स्थायी समितीच्या सदस्यांची भावना लक्षात घेवून सदरील रस्त्यांचे काम २ ते ३ दिवसांत सुरू करण्यात यावे.

अति.शहर अभियंता: तातडीचे काम समजून याबाबत मा.आयुक्तांकडे जावून तशी प्रत्यक्ष चर्चा करून आपणांस कळविण्यात येईल.

मा.सभापती :य रस्त्याच्या कामासाठी मी मा.आयुक्त यांना प्रत्यक्ष भेटतो.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : महापालिकेच्या तिजोरीत सध्या खडखडात आहे तेव्हा प्रशासनाने काही उपयायोजना केल्या आहेत का? निधी कोढून येणार आहे का? महापालिकेत जो खर्च होतो त्यावर नियंत्रण कसे ठेवता येणार. तसेच उपकर व जकात बाबत प्रशासनाने कुठले उपयायोजना केल्या आहेत. उत्पन्नाच्या दृष्टीने सजेशन देतो त्याची कार्यवाही करावी.

१. वाहन बिलावर नियंत्रण आणावे.

२. गाडयांवर व पेट्रोल खर्चावर नियंत्रण आणावे.

३. मालमत्ता सर्वेक्षण होणे आवश्यक आहे.

४. आवश्यक नसतांना जिथे कामाचे बजेट अलॉट केले आहे त्या ऐवजी आवश्यक तिथे ते वळती करण्यात यावे.

५. कंत्राटदाराचे बिले थकीत आहे ते देण्यासाठी काही तरतुद केलेली आहे का? प्रशासनाने एक कमीटी नेमुन कामाचे प्राध्यन्यक्रम ठरवून अधिकाऱ्यांनी थोडे थोडे करून बील अदा करण्यात यावी म्हणजे कंत्राटदार पुढील काम करणेस तयार होतील.

श्री.संजय जोशी : एप्रिल पासून उपकराची नोंदणी झाली असती तर २० ते २५ हजार नोंदणी झाली असती. ती का केली नाही? करता येत होती का?

उपआयुक्त(म) : उपकराचे अंमलबजावणी बाबत शासनाचे अध्यादेश १ नोव्हेंबर २००८ रोजी प्राप्त झाले, त्यापुर्वी कायद्याने नोंदणी करता येत नव्हती.

श्री.संजय जोशी : शासनाने जकात बंद करण्याची घाई केली. महानगरपालिकेचा दररोजचा ३७ लाख खर्च एवढा आहे. एक रूपयाचे सुध्दा मेंन्टनन्स नाही. पगार, लाईट बील, टेलिफोन बिल, अन्य असलेले कर्जाचे हप्ते यावरील हा खर्च आहे. चार दिवसांपूर्वीचे महानगरपालिकेचे ओपनिंग बॅलन्स फक्त १०,०००/- एवढे आहे. यावर प्रशासनाने कुठले पर्याय शोधले आहेत. काही वार्डात १०० प्रॉपर्टी आहेत व काही वार्डात ४० लाख रू. कराच्या प्रॉपर्टी आहेत. ज्यांनी पुर्ण टॅक्स अदा केलेला आहे त्यांनी हा त्रास का सोसावा.

मा.सभापती : मुख्य लेखाधिकारी यांनी याबाबत खुलासा सादर करावा.

मुख्य लेखाधिकारी : १ नोव्हेंबर २००८ रोजी जकात कर बंद झाल्यामुळे उत्पन्न कमी झालेले आहे. साधारणतः १६ कोटी मासीक उत्पन्न होते, या महिन्यात जकातीचा हप्ता आल्याने २.१५ कोटी वाढलेले आहे. वेतन राखीव निधीतून वेतन व भत्त्यावर ४.५० कोटी खर्च झालेला आहे. नियमीत उत्पन्नातुन वेतन अदा केलेले नाही. राखीव निधी खर्च केला तो पुन्हा टाकावाच लागेल.

श्री.संजय जोशी : शासनाच्या नियमाप्रमाणे तीन महिण्याचे वेतन आगाऊ स्वरूपात बॅकेत जमा पाहिजे. पुढच्या महिन्याचे वेतनाची सुध्दा तरतुद नाही.

मुख्य लेखाधिकारी : त्यातुन जे १.२५ कोटी व्याज येते ते घरून पुढील महिण्याचे वेतन आपण करू शकतो.

श्री.संजय जोशी : १५ दिवसांपासून जकात नाही, मनपाचे उत्पन्न कमी झाले. ते वाढविण्यासाठी काय उपाययोजना करणार आहोत.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर: हा प्रश्न अधिकारी, स.पदाधिकारी मिळूनच सुटू शकेल.

मा.सभापती : मी आयुक्तांशी चर्चा केली २० कोटीचा निधी शासनाकडुन २-३ दिवसात येत आहे.

उपआयुक्त (म) :शासनाकडे कालच नोव्हेंबर, डिसेंबरचे १५-१५ कोटी एकुण ३० कोटींची मागणी केली आहे.

श्री.सतिष कटकटे : नारेगांव कचरा डेपो स्थलांतरीत करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने काय आदेश दिले, प्रशासनाने या संदर्भात काय उपाय योजना केली.

उपअभियंता (स्लम) : नारेगांव येथिल कचरा डेपो हलविण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने आदेशीत केले आहे. कचरा डेपोसाठी जागा विमानतळाच्या मागे नायगांव २२ कि.मि. अंतरावर आहे. तेथे जागा निश्चित केली, त्यांच्या ग्रामसभेसोबत चर्चा चालू आहे.

श्री.संजय जोशी : ग्रामसभेचा ठराव आला आहे काय? मनपाने जागा निश्चित करून उपयोग नाही, ग्रामपंचायतीची मान्यता पाहिजे.

उपअभियंता (स्लम) : ग्रामपंचायतचा ठराव आलेला आहे.

श्री.संजय जोशी : नविन नियमाप्रमाणे ग्रामपंचायतचा ठराव ग्रामसभेच्या मंजूरीसाठी ठेवावा लागतो. नसता संबंधीताचे सरपंच पद जाते.

उपअभियंता (स्लम) : त्या नियमाप्रमाणेच ग्रामपंचायतीशी चर्चा चालू आहे. तसा त्यांचा ठराव आलेला आहे.

श्री.संजय जोशी : रॅमके कंपनीला घनकचरा हाताळणी/व्यवस्थापनाचे कामा संदर्भातील निविदेचे पुढे काय कार्यवाही झाली.

अति.शहर अभियंता: दि. ०८.१०.२००८ रोजी ॲग्रीमेंट झालेले असून औरंगाबाद शहरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी रॅम्के कंपनीला ठेका मिळालेला आहे. तिन महिण्यांची मुदत लागणार आहे. तिन महिण्यांमध्ये जी काही वाहने लागणार आहेत ती वाहने पुरविणेसाठी तिन महिण्यांची मुदत देण्यात आलेली आहे.

श्री.संजय जोशी : आताच खुलासा केला, पॅचवर्क करणेसाठी पैसा नसतांना महिण्याला ९० लाख रूपये देणार आहोत. पुर्वी महापालिकेची आर्थीक स्थिती योग्य नाही म्हणून संचिकेवर नोटींग टाकण्यात आले होते. परंतु मा.आयुक्तांनी नंतर मंजूरी दिली. प्रशासनाने कशा प्रकारे तरतुद केली आहे.

अति.शहर अभियंता: सदरील काम हे मार्च नंतर सुरू होणार असल्याने पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पात तशी तरतुद करावी लागेल.

श्री.संजय जोशी : सध्याच्या अर्थसंकल्पातील कामे होत नाही, पॅचवर्क करणेसाठी पैसा नाही तर महिण्याला ९० लाख रूपये कोठून देणार. मा.आयुक्तांनी १० लाखाची कामे करणेस सांगीतले, खाली एका ओळीत म्हटले मागील निर्देशीत आर्थीक निर्बंधाप्रमाणे यासाठी १० लक्षाची तरतुद कोठून करणार.

अति.शहर अभियंता: प्रत्यक्षात काम मार्च नंतर सुरू होणार आहे, मा.सर्वोच्च न्यायालयाने सदरील योजना राबविण्यासाठी बंधनकारक केले आहे. सिस्टीम कशा प्रकारे राबवायची याबाबत मा.न्यायालयाने सांगीतले आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर:रॅमके कंपनीला द्यावे असे मा.न्यायालयाने म्हटले नाही.

श्री.संजय जोशी : प्री बीडच्या मिटींग झाल्यानंतर ३ वर्ष वाढवून देण्यात आले. प्रशासनाने आपआपल्या ॲडजेस्टमेंट प्रमाणे टेंडर तयार केले.

अति.शहर अभियंता: प्रीबीडच्या मिटींगचे मिनीटस् तयार झालेले आहेत. त्यावर सर्वांच्या स्वाक्षऱ्या आहेत. वाहनाचे लाईफ १० वर्षाचे असते तीन वर्ष वाढवले नसते तर मनपाला नुकसान होते.

मा.सभापती : स्थायी समितीने कचरा उचलण्याचा ठराव नामंजूर केला होता. त्या बाबत प्रशासनाने काही काळजी घेतली होती का?

अति.शहर अभियंता: सर्वसाधारण सभेपुढे गेला सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली. त्यानुसार पुढील कारवाई करण्यात आली.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: रॅम्केच्या निमित्ताने कॅन्सर शहराला लागतो आहे ते रोखण्याचे काम सर्वांचे आहे. सदरील कचरा उचलण्याचा ठराव घेतला तो फिजीबल नाही, नागरीकांना परवडणारा नाही त्यामुळे सदरील ठराव रद्द करण्यात यावा.

श्री.संजय जोशी : व्यवहारीक नसल्याकारणाने मंजुरी दिली नव्हती. रॅमके कंपनीसोबत करार केल्यास, कर्मचाऱ्यांचे पगार देण्याची स्थिती राहणार नाही. वॉर्डातील एकही काम होणार नाही, रॅम्केचे आपण कायदेशीर करारनाम्यानुसार बांधलेले राहू. हे महापालिकेस परवडणारे नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: सदरील करारनामा रॅम्के संस्थेने मान्य केला आहे का? करार करणेचा अधिकार कुणाला आहे व करार करतांना कोणकोण त्याचे सभासद असतात.

अति.शहर अभियंता: महासभा किंवा स्थायी समिती यांनी जे जे काही निर्णय घेतलेले आहे त्या निर्णयाची अंमलबजावणी करणे हे प्रशासनाला क्रमप्राप्त असते. त्यानुसार कार्यवाही होते, ॲग्रीमेंटचा जो भाग आहे तो प्रशासनाचा आहे आणि तो त्यांनी केलेला आहे. ॲग्रीमेंट करतांना मा.महापौर, मा.उपमहापौर, विरोधी पक्षनेता अशा पदाधिकाऱ्यांच्या समक्ष ॲग्रीमेंट केलेला आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: करारनामा करतांना कुणाच्या सह्या घेणे बंधनकारक आहे.

अति.शहर अभियंता: नियमानुसार प्रशासन आणि संबधीत व्यक्ती यांच्यात करारनामा होतो, अशी माझी माहिती आहे. यापेक्षा लिगल माहिती विधी सल्लागार यांचेकडून घ्यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: करारनामा करतांना मा.आयुक्त व संबधीत एजन्सी यांचेशी करारनामा करतांना स्थायी समितीचे दोन सदस्याच्या स्वाक्षऱ्या लागतात.

श्री.संजय जोशी : करारनामा करतांना मा.आयुक्त व संबधीत एजन्सी यांचे सहया पाहिजे, परंतु ते रद्द केले अस्तांना करारनामा कसा केला.

विधी सल्लागार : प्रशासनातर्फे करारनामा करण्याचा मा.आयुक्तांना अधिकार आहे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याला किंवा संबधीत कंपनीने

किंवा कंपनीने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती आणि स्थायी समितीचे दोन सदस्यांसमोर करार करणे क्रमप्राप्त आहे. हे नियमानुसार आहे.

श्री.संजय जोशी : नियमानुसार स्थायी समितीचे सदस्य असायला पाहिजेत का? स्पेक सारखीच परिस्थिती होणार आहे, वाईट परिस्थितीतुन रॅम्के संस्था महानगरपालिकेला लुटून नेईल.

अति.शहर अभियंता: स्थायी समिती सदस्यांची करारनामाच्या वेळी स्वाक्षरी असायला हवी याबाबत काही कल्पना नाही. स्थायी समितीच्या दोन सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: स्थायी समितीच्या सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या नसतील तर सदरचा करार कायदेशीररित्या नाही तसेच ते महानगरपालिकेला, नागरीकांना परवडणारे नाही. त्यामुळे तो रद्द करण्यात यावा व यापुढे सदर एजन्सीशी कोणताही व्यवहार करून नये.

मा.सभापती : रॅमके कंपनीचा ठराव यापूर्वी स्थायी समितीने बहूमताने रद्द केलेला आहे. प्रशासनाने सदस्यांच्या भावना आणि त्यांनी घेतलेला ठराव लक्षात न घेता या बाबीकडे जाणुन बुजून दुर्लक्ष केले असे दिसून येते. प्रशासनाने आपल्या स्तरावर निर्णय घेतलेले आहेत. महानगरपालिकेची आर्थीक स्थिती बिकट असून महानगरपालिकेजवळ तिन महिण्याच्या रिझर्व फंडचे पेमेंट करणेस निधी नाही. रॅम्केबरोबर प्रशासनाने केलेला करार बेकायदेशीर असून तो तात्काळ रद्द करून प्रशासनाने पुढील बैठकीत तसे कळवावे व रॅम्के कंपनीसोबत कुठलेही व्यवहार करण्यात येवू नये.

मा.सभापती : मोबाईल बील, लाईट बील, वाहतुक, पेट्रोल यावर किती खर्च होतो सविस्तर खुलासा करावा.

श्री.सतिष कटकटे : मागील बैठकीत नगर रचना विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या बदलीबाबत रूलिंग देण्यात आली होती. त्याबाबत माहिती देण्यात यावी.

मुख्य लेखाअधिकारी : महानगरपालिकेला मासिक वाहन इंधनावर, दुरूस्तीवर साधारणत: १७ लाख रूपये खर्च येतो, मोबाईलचे २ लाख ३० हजार ते २ लाख ६० हजार खर्च येतो. पीबीएक्सचा टेलिफोन खर्च ६० हजार एवढा आहे.

श्री.संजय जोशी : अत्यावश्यक सेवेतील अधिकाऱ्यांना वाहन पुरवविण्यात यावे. मनपाचा खर्च कमी होईल. टेलीफोन बिलातही कपात करावी.

मा.सभापती :याबाबतीत मुख्यलेखापरिक्षक यांनी काटकसरीचे उपाय सुचविलेले असून मा.आयुक्त व स्थायी समितीला कळविलेले आहे. त्यासंबंधी सभागृहास अवगत करण्यात यावे.

मुख्य लेखापरिक्षक : महानगरपालिकेची आर्थीक स्थिती नाजूक असल्यामुळे काटकसरीचे उपाय व उत्पन्न वाढीसाठी काही उपाययोजना सुचविल्या आहेत.

१) शहरात व्यवसायिक नळ कनेक्शनची संख्या फक्त १०८० एवढी आहे ही बाब वस्तुनिष्ठ स्वरूपाची नाही. त्यामुळे प्रशासनाने सर्व्हे करून तात्काळ घरगुती, व्यवसायिक नळ कनेक्शनचा सर्व्हे करून तात्काळ कार्यवाही करून वसूली करण्यात यावी.

२) मालमत्ता कर वसुलीत वाढ करण्याचा प्रस्ताव नमुद केलेला आहे. स्पेकने प्रशासनानेही काही मालमत्तेचे सर्व्हे केलेले नाही, तो करणे गरजेचे आहे, मालमत्ता विभागात १९७५ पासून वेगवेगळया संस्थांना भाडेतत्वावर नाममात्र शुल्कावर देण्यात आलेल्या आहेत. त्याचाही पुर्नविचार करणे गरजेचे आहे कारण कोटयावधी रूपयांच्या मालमत्ता आहेत.

३) प्रशासनाने चार चाकी वाहने दिलेले आहेत. २००७-२००८ मध्ये १ कोटी ९३ लाख रूपये खर्च झालेले आहेत. अत्यावश्यक सेवेतील अधिकाऱ्यांनाच जे विभाग प्रमुख, वार्ड अधिकारी यांनाच वाहने पुरविली पाहिजे जेणे करून खर्चात काटकसर होईल.

४) दुरध्वनी, मोबाईलवर २००७-२००८ मध्ये वर्ग-१ अधिकाऱ्यांना निवासस्थानी व कार्यालयात दुरध्वनी असतांना स्वतंत्र दुरध्वनी व मोबाईल दिलेला आहे. त्यात एकुण खर्च ३४ लाख एवढा आहे. विभाग प्रमुख व अत्यावश्यक सेवेतील अधिकाऱ्यांना सिम कार्डची सुविधा देण्यात यावी. तसेच ज्या अधिकाऱ्यांना मोबाईल दिलेला आहे त्यांना निवासस्थानी दुरध्वनी देण्याची आवश्यकता नाही. ते तात्काळ थांबविण्यात यावे.

५) जाहिराती व प्रसिध्दीवर खर्च फार मोठया प्रमाणावर आहे त्यात ६० ते ७० टक्के कपात करणे गरजेचे आहे, ई-टेंडरीग पध्दत सुरू केलेली आहे त्यामुळे दोन ओळीत जाहिरात देवू शकतो.

६) रस्त्यावरील अनेक ठिकाणचे विद्युत दिवे चालू असतात त्यात काटकसर करावी.

७) विवीध सत्कार सोहळे बंद करावेत. मा.महापौर,मा.आयुक्त व स.सदस्य/पदाधिकारी यांना आवश्यक वाटतील तेवढेच कार्यक्रम घेण्यात यावेत.

८) मनपा अधिकारी, स.पदाधिकारी यांच्या दौऱ्यात कपात करण्यात यावी. फर्निचर, स्टेशनरी, रंगरंगोटी, झेरॉक्स आणि भांडारमध्ये अनावश्यक खरेदी होते. त्याचा आढावा घेवून ५० टक्केपर्यंत कपात करू शकतो.

९) शाही ॲटम म्हणजे गाड्यांमध्ये ए.सी. बसविणे, अनावश्यक रंगरंगोटी, कक्षामध्ये सजावट ई. बाबी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: मुख्यलेखापरिक्षक यांनी दिलेला अहवाल स्विकारून प्रशासनाने त्याचा अभ्यास करावा. काटकसर करणेसाठी एक कमिटी असावी.

श्री.संजय जोशी : गाडयांच्या खर्चामध्ये ५० टक्के कपात विभाग प्रमुख, वॉर्ड अधिकारी अशा अत्यावश्यक सेवेतील अधिकाऱ्यांना वाहन द्यावे.

श्री.जावेद हसन खान: नगर रचना अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्या बाबत माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त(म) : नगर रचना अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदलीचे संदर्भांत दोन दिवसात सदर संचिका मा.आयुक्तांकडे सादर करण्यात येईल.

श्री.सतिष कटकटे : मागील बैठकीत मा.सभापतींनी रूलिंग दिल्यानंतरही त्यावर कार्यवाही होत नाही. किती दिवसांपासून अधिकारी/कर्मचारी त्या विभागात काम करतात.

मा.सभापती : संबधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

सहाय्यक आयुक्त-१ : बदल्या बाबतची संचिका सादर करण्यात आलेली आहे. किती दिवसांपासून सदर विभागात अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहे त्याची माहिती थोडयाच वेळात उपलब्ध करून देण्यात येईल.

श्रीमती सफिया मोमिन: गुंठेवारी बाबत खुलासा करण्यात यावा. नाही तर गुंठेवारी कायदा रद्द करून तेथे पायाभुत सुविधा देण्यात याव्यात.

गुंठेवारी कक्ष प्रमुख: वॉर्ड क्र.९६ मधे गुंठेवारी अंतर्गत आतापर्यत फक्त २,३७,८९९/- रूपये जमा झालेले आहेत. त्याचे वार्ड कार्यालय-फ अंतर्गत १०० टक्के चलन वाटप केलेली आहेत. परंतु लोक तिथे पैसे भरत नाहीत. स.नगरसेविका यांचे पत्र आलेले आहे. पटेल लॉन जवळील काही इमारती, टेक्सटाईल कंपनीमध्ये चालू असलेली अनअधिकृत बांधकामे तसेच वार्ड मधील ज्या लोकांना आपण चलन वाटप केलेले आहेत, त्यांच्या विरूध्द घरे तोडण्याची कारवाई गुंठेवारी अधिनियम २००१च्या कलम ७ च्या पोटकलम २ अन्वये प्रस्तावित केली होती. त्याला मा.आयुक्तांनी परवानगी दिलेली आहे. त्यानुसार सविस्तर सर्व्हे करून पंचनामे तयार केलेले आहेत. दोन दिवसांपूर्वी उपआयुक्त(म) यांनी याबाबत विचारणा केली होती माझे विभागात कर्मचारी आहेत ते निवडणुकीच्या कामासाठी व काही जण सुट्टीवर गेंलेले असल्याने कामावर त्याचा परिणाम झालेला आहे. दोन महिण्यांपूर्वी आम्ही एकुण ३५० संचिका निकाली काढलेल्या आहेत. संपूर्ण औरंगाबाद हद्दीत १४१ गुंठेवारी वसाहती आहेत. त्यामधुन आम्ही ४ कोटी ३५ लाख रूपये जमा केलेले आहे. त्यामध्ये वार्ड-ई मध्ये सर्वात जास्त १ कोटी ८१ लाख जमा केली आहे. सिल्कमिल कॉलनी येथील जनता प्रतिसाद देत नाही. एक वेळेला आमचा पुर्ण कॅम्प तेथील जनतेने उधळून लावला होता. स.नगरसेविकांचा जो वॉर्ड आहे तिथे टेक्निकल प्रॉब्लेम असा आहे की, ज्या वॉर्डामधून स.नगरसेविका निवडून आलेल्या आहेत, त्यातील काही भाग ग्रामपंचायत हद्दीमध्ये येतो व तेथील लोक सुविधा संपूर्ण महापालिकेकडून घेत आहेत. गुंठेवारी अंतर्गत तिथे कर भरणा केला जात नाही. त्यांच्याविरूध्द कारवाई सुरू आहे. दोन ते तिन टेक्निकल स्टाफची गरज आहे ते पुरविले तर सदरची कारवाई लवकर पुर्ण करता येईल.

मा.सभापती : रू.२,३७,८९९/- वसूल झालेले आहेत. तेवढे विकासाचे काम झालेले आहे काय?

गुंठेवारी कक्ष प्रमुख : रू.२,३७,८९९/- रूपये जमा झालेले त्यामधुन वार्ड अभियंता-फ यांनी ड्रेनेज कामासाठी १,६०,०००/- रूपये अदाजपत्रकास मंजूरी मिळालेली आहे व ते काम त्वरीत सुरू होणार आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : काही वस्त्या आहेत ज्या की, गुंठेवारीत व गलिच्छ वस्तीत पण नाही. परंतु तिथे मोठमोठे बंगले, घरे झालेली आहेत व ते पाडण्याचे आदेशीत झालेले आहे. तसेच चिश्तीया कॉलनीस देखील अनाधिकृत म्हणून संबोधले जाते. त्यासाठी बजेटची तरतुद नाही. ड्रेनेज, पाणी पुरवठा लाईन तिथे अस्तित्वात आहे. फक्त रोडची परवानगी तिथे देत नाही. सदरील भाग गुंठेवारीत आहे की शहरात आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

गुंठेवारी कक्ष प्रमुख : चिस्तिया कॉलनी एन-६ भाग गुंठेवारी भागात आहे त्याचा संपूर्ण सर्व्हे केलेला आहे. गुंठेवारी अधिनियम २००१ अस्तित्वात आल्यानंतर असे भाग अनाधिकृतपणे विकसीत झालेले आहे तिथे शासनाने काम करणेस बंधन टाकलेले आहे. गुंठेवारी अधिनियम अस्तित्वात येण्यापूर्वी आपल्याला कोढेही विकास कामे करण्याबाबत बंधन नव्हते. चिस्तिया कॉलनी हि सिडकोमधील दोन भाग आहे जे गुंठेवारीमध्ये समावेश आहे. सदरची संचिका मंजूर करू शकत नाही. एक चिस्तिया कॉलणी, ईनु हॉउसिंग सोसायटी, आझाद कॉलेज समोरील. चिस्तिया कॉलनी सन १९७४ मध्ये वक्फ बोर्डने १ रूपया किंमतीत सिडकोला हस्तांतरण केली होती आणि त्यानंतर सिडको प्राधिकरणाने ती जागा एचएमटीला ५,३५,०००/- मध्ये दिली होती त्या जागेवर सिडको, एचएमटीचा क्लेम आहे. त्याप्रमाणे चिस्तिया कॉलनीमध्ये गुंठेवारी करू नये म्हणून सिडको प्रशासन सतत पाठपुरावा करत आहे. ईनु हॉउसिंग सोसायटीची हीच अडचण आहे, सर्व्हे नं ११७ चा भाग आहे, आझाद कॉलेजला प्ले ग्राउंडसाठी प्रदान केली होती.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : इतरांची जशी गुंठेवारी केलेली आहे तशी चिस्तिया कॉलनी येथेही गुंठेवारी सुविधा पुरविण्यात याव्या.

मा.सभापती : ईनु हौसिंग सोसायटीच्या गुंठेवारीबाबत खुलासा करण्यात यावा.

गुंठेवारी कक्ष प्रमुख : ईनु हौसिंग सोसायटीच्या लगत नॅशनल हॉ.सोसायटी आहे. त्या सर्व्हे नं ११६ मध्ये दोन्ही सोसायटी येतात. नॅशनल हॉ.सोसायटीचा कुठलाही वाद नाही.

श्री. नारायण कुचे : गुंठेवारी भागात खासदार आमदार तसेच नगरसेवक निधी वापरता येत नाही. परंतु कालच्या दै. लोकमतमध्ये मा.आमदार श्री. दर्डा साहेब यांचे निधीतून ३७ लक्षचे कामाचे उदघाटन केले हे सत्य आहे का? असा निधी वापरता येतो का, शासनाची मान्यता आहे का, खुलासा करावा.

मा.सभापती : सदर कामासाठी महापालिकेने एनओसी दिलेली आहे.

श्री. नारायण कुचे : विकास कामासाठी आमचा विरोध नाही. जसे मा.खासदार मा.आमदार निधीतून अशी कामे होत असतील तर नगरसेवक निधी सुध्दा वापरता येतो का? शासनाने मा.खासदार मा.आमदार यांचा निधी अशा ठिकाणी वापरू नये असे निर्देश दिलेले असतांना आमदार निधी वापरला जात असेल तर नगरसेवक निधी का वापरला जात नाही.

मा.सभापती : हा प्रश्न मा. आयुक्तांच्या पातळीवरील आहे.

गुंठेवारी कक्ष प्रमुख : मंत्रीमंडळाचे बैठकी पूर्वी महापालिकेने गुंठेवारी भागात मा.आमदार मा.खासदार व नगरसेवकांच्या निधीतून विकास कामे होण्यासाठी शासनाच्या निर्देशानूसार एक प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेमार्फत शासनाकडे पाठविला होता. गुंठेवारी भागातील कामाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे एनओसी पाठवावी लागते. ज्या वसाहतींमध्ये स्टेशन सर्वेचे काम झालेले आहे. अशा वसाहतीमध्ये एनओसी दिली जाते.

श्री.संजय जोशी : जर या भागात ८० टक्के सर्वेचे काम झालेले असेल व मा.आमदार निधीतून काम करण्यास एनओसी देत असेल तर नगरसेवकही पत्र देवून निधी वापरावा म्हणून पत्र देतील तर ती कामे करणार काय?

मा.सभापती : ही कार्यवाही मा. जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत झालेली आहे.

श्री. संजय जोशी : तसे नाही आपण गैरसमज करून घेवू नये. मा.आमदार श्री.दर्डा साहेब यांचे निधीतून काम होत आहे त्यास विरोध नाही. मा.दर्डा साहेब यांनाही विरोध नाही. उलट ही चांगली गोष्ट आहे त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

मा.सभापती : महापालिका त्या भागात १० हजार खर्च करीत नाही. मा.आमदार श्री.दर्डा साहेब यांचे निधीतून त्यांनी ६५ लक्ष निधी दिलेला आहे.

श्री.संजय जोशी : जे नियमात नाही ते मा.दर्डा साहेब करतात म्हणजे त्यांचे अभिंनदनच करायला पाहिजे. याच प्रमाणे अशा भागात नगरसेवकांचा निधी वापरण्याचे आपण आदेशीत करावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : मा.आमदार हे शहरात निधी खर्च करीत असतील तर त्यांचे अभिनंदनच करायला पाहिजे.

श्री. संजय जोशी : अभिनंदन केलेले आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: जर मा. आमदार, मा.खासदार निधीतून काम करण्याची एनओसी मिळत असेल तर नगरसेवक निधीतून ही काम करण्यास हरकत नसावी. एनओसी घेण्याची गरज नाही, असे वाटते.

श्री.नारायण कुचे :मा.आमदार, मा.खासदार यांचा निधी वापरण्यास परवानगी मिळत असेल तर नगरसेवकांचा निधी गुंठेवारी भागात वापरण्यास परवानगी द्यावी.

गुंठेवारी कक्ष प्रमुख : सभागृहाने याबाबतीत निर्णय घ्यावा. सभागृहाचे निर्णयाप्रमाणे अंमलबजावणीसाठी संचिका मा.आयुक्तांकडे सादर करण्यात येईल.

श्री. संजय जोशी : मा.आमदार, मा.खासदार यांचा निधी गुंठेवारी भागात वापरला जात असेल तर नगसेवक निधीतून अशा वसाहतीत कामे करण्यास परवानगी देण्यात यावी.

मा.सभापती : स.सदस्य श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर व स.सदस्य जावेद हसन खान यांनी मा.आमदार राजेद्र(बाबूजी)दर्डा यांचे स्थानिक विकास निधीतून विविध वार्डामध्ये विकास कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करावे अशी सुचना मांडली. त्यास स.सदस्य श्री.संजय जोशी, श्री. नारायण कुचे, श्री.सतीष कटकटे यांनी अनुमोदन दिले. सभागृहातर्फे मा.आमदार श्री.राजेद्र (बाबुजी) दर्डा यांचे अभिनंदन करण्यात आले.

मा.सभापती : नगर रचना विभागात कोणते अधिकारी केव्हा पासून आहेत यासंबंधीची माहिती आलेली आहे. सभागृहास माहिती द्यावी.

सहाय्यक आयुक्त-१ : श्री.व्ही.जी.वझे, उपअभियंता हे १४.०७.२००४ पासून कार्यरत आहेत. चार वर्ष एक महिना झालेला आहे. श्री.पी.जी.पवार एक वर्ष एक महिना, श्री.खालेद सैफउद्दीन दिड वर्ष, श्री.प्रशांत विटेकर तिन वर्ष, श्री.एम.एम.खान एक वर्ष, श्री.संजय चामले सात वर्ष, श्री.एन.बी.साळवे तिन वर्ष, श्री.संजय कोंबडे तिन वर्ष, श्री.सलील अहमद खान तिन वर्ष, श्री.शिवाजी लोखंडे तिन वर्ष, श्री.देवेंद्र डेंगळे सात वर्ष, श्री.बाळासाहेब शिरसाठ सात वर्ष, श्री.शेख शफिक पाच वर्ष, श्री.व्हि.वी.भांगे अकरा वर्ष, श्री.सुहास पंडीत एक वर्ष दोन महिने, कु.आफरिन अय्युब एक वर्ष तिन महिने.

श्री.सतिष कटकटे : नियमानुसार किती वर्षांनी एका विभागातून दुसरीकडे बदली होउ शकते.

सहाय्यक आयुक्त-१ : सरासरी तिन वर्षांनंतर बदली होणे अपेक्षीत आहे.

उपआयुक्त (म) : नगर रचना विभागाचे अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदली संदर्भात तिन वर्षपेक्षा जास्त कालावधीत अधिकारी/कर्मचारी एका टेबलवर आहेत त्यांची संचिका आजच बदलीसाठी सादर करण्यात येईल.

**<u>विषय क्र. १३० :</u>**

**दिनांक २१/१०/२००८** (का.प.क्र.**१४**), रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

श्री.सतिष कटकटे : विषय क्रमांक १३० मधील दिनांक २१.१०.२००८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतीत विषय क्रमांक ११४ मधील रविवारी आठवडी बाजाराचा ठेका केव्हा संपलेला आहे.

मालमत्ता अधिकारी : जाफरगेट येथील ठेका ३१.०३.२००८ रोजी संपलेला आहे. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडुन वसुली केली सध्या वसुली होत आहे. आठ लाख दहा हजार वसूल झालेले आहेत. एप्रिल ते

ऑक्टोबर मध्ये तिन लक्ष पुढे व नोव्हेंबरच्या दोन हप्त्यामध्ये अठरा हजार वसूल करण्यात आले होते.

श्री.सतिष कटकटे : महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान झाले आहे का?

मालमत्ता अधिकारी : ठेकेदार ज्या प्रमाणात वसुली करत होते, त्यापेक्षा कमी प्रमाणात वसूली झाली आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : एका आठवडी बाजारात ठेकेदार १८ हजार रूपये देतो व आपले कर्मचारी फक्त आठ ते दहा हजार वसूल करतात ही बाब योग्य नाही.

मा.सभापती : इतिवृत्तातील विषय क्र.११४ मंजुर करण्यात येतो. दुरूस्तीसह इतिवृत्तास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दि.२१/१०/२००८ रोजीच्या इतिवृत्तामधील प्रस्ताव क्र.**११४** - रविवार आठवडी बाजार फी वसुलीचा ठेका ऑक्टोबर २००८ ते ३१-३-२००९ या कालावधीकरीता देण्यासाठी जाहीर लिलाव बोलीनुसार श्री.दिपचंद मोहन रेसवाल यांनी प्रतिबाजार रू.१८,१११/- अशी बोली बोललेली असल्याने, श्री. दिपचंद मोहन रेसवाल यांना रक्कम रू.१८,१११/- प्रतिबाजार फी वसुलीचा ठेका स्थायी समितीमध्ये त्यांना बाजार मंजुर झालेल्या तारखेपासुन ठेका देण्यास अटी शर्तीस अधीन राहुन मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या दुरूस्तीसह दिनांक २१/१०/२००८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.९४ बन्सीलालनगर येथे क्रिडा संकुल विकसीत करणे करीता सा.बां. विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रूपये २४,९९,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.१७० अन्वये दि.१९.३.२००८ च्या सभेमध्ये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकुण ४ निविदा विक्री झाल्या व ४ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | इरम कन्स्ट्रक्शन कंपनी | ६.७% कमी दराने |
| २. | एस. ए. देशमुख | ४.२५% कमी दराने |
| ३. | ड्रिमलँड कन्स्ट्रक्शन | ९.७५% जास्त दराने |
| ४. | कोहिनुर कन्स्ट्रक्शन | १८.५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.७% कमी दराची निविदा इरम कन्स्ट्रक्शन कंपनी यांची प्राप्त झालेली आहे. स.सदस्य श्री.रविंद्र गांगे, सौ.अल्पा विकास जैन यांनी मागणी केल्यानुसार सदरील कामाची निविदा रक्कम रू.२२,५४,६००/- असुन मा.आयुक्त यांचे आदेशान्वये प्रथम १०.०० लक्ष मर्यादे पर्यंत काम करण्यात यावे व उर्वरीत कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यात यावे.

त्यानुसार **इरम कन्स्ट्रक्शन कंपनी** यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा **६.७% कमी दराची** निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.सभापती : प्रस्ताव कुणाकडून आला आहे त्याचे नाव यात नाही. विषय क्रमांक १३१ मधे निविदाची रक्कम रूपये २२,५४,६००/- असुन मा.आयुक्त यांचे आदेशान्वये प्रथम १० लक्ष मर्यादेपर्यंतचे काम करण्यात यावे म्हणून नमुद केलेले आहे. सदरचे काम करणे आवश्यक आहे का?

कार्य.अभियंता : १० लाखापर्यंतचे कामे टप्प्याटप्प्याने करू शकतो, बॅडमिंटन ग्राउंड, जॉगींग ट्रॅक, ईत्यादी.

मा.सभापती : सदरील कामे ही तातडीचे आहेत का? महानगरपालिकेची आर्थीक स्थिती चांगली नसतांना सदरील खर्च कशासाठी करावयाचा? निधी उपलब्ध झाल्यास काम सुरू करण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रभाग क्र.९४ बन्सीलालनगर येथे क्रिडा संकुल विकसीत करणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक **इरम कन्स्ट्रक्शन कंपनी** यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा **६.७% कमी** दराने सदर काम करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. प्रथम १०.०० लक्ष मर्यादे पर्यंत काम करण्यात यावे व उर्वरीत कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यात यावे. त्यास मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३२ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक वित्त विभाग मभवा/११०८/प्र.क्र.७९/सेवा-९ मंत्रालय, मुंबई दि.१५ ऑक्टोबर २००८ नुसार राज्य शासकिय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दि. ०१ जुलै २००८ पासून ७% वाढ मंजुर केलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना दि.०१.०७.२००८ पासून महागाई भत्ता ४७% ऐवजी ५४% दराने अदा करण्यासाठी मासिक रू.१७.१० लक्ष खर्च अपेक्षित आहे. सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात वेतन व भत्ते अदा करण्यासाठी स्वतंत्र तरतुद करण्यात आलेली आहे. या तरतुदीतून सदरील खर्च भागविण्यात येईल. महागाई भत्ता ४७% ऐवजी ५४% या दराने महानगरपालिका कर्मचाऱ्यांना माहे १ जुलै २००८ पासून लागु करण्यास व ऑक्टोबर २००८ पर्यंतची थकबाकी अदा करण्यास तसेच माहे नोव्हेंबर २००८ च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात महागाई भत्ता समाविष्ट करण्याकरिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक वित्त विभाग मभवा/११०८/प्र.क्र.७९/सेवा-९ मंत्रालय, मुंबई दि.१५ ऑक्टोबर २००८ नुसार राज्य शासकिय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दि. ०१ जुलै २००८ पासून ७% वाढ मंजुर केल्यानुसार, औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना

महागाई भत्ता ४७% ऐवजी ५४% या दराने माहे १ जुलै २००८ पासून लागु करण्यास व ऑक्टोबर २००८ पर्यंतची थकबाकी अदा करण्यास तसेच माहे नोव्हेंबर २००८ च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात महागाई भत्ता समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

***ऐनवेळेचे विषय***

मा.सभापती : ऐनवेळचे प्रस्ताव मंजुर करण्यात येतात.

**विषय क्र. १३३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो.हर्सुल येथे मनपा क्वॉर्टर जवळ व्यायामशाळा बांधणे करीता सा.बां. विभागाच्या सन २००४-०५ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.९,९९,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता काझी मुबारीजोद्यीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.८६% जास्त दराची निविदा प्रस्तावास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार काम प्रगती पथावर असुन स.सदस्य श्री.पुनमचंद बमने यांनी Tandur फरशी ऐवजी Vetrified Tiles, बॉक्स टाईप विंडो व समोरील भागात पेव्हींग ब्लॉक बसविण्याची सुचना केली आहे. सदरील बाबींमुळे कामामध्ये एकुण रू.३.०० लक्ष ची वाढ होत आहे. वाढीव कामासाठी मनपा अर्थसंकल्प २००८-०९ मध्ये पान क्र.डब्ल्यु-५० अ.क्र.५ वर एकुण १३.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. सदरील अतिरिक्त वाढीव कामास मा.आयुक्त यांनी मान्यतेस्तव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस केलेली आहे.

करीता उपरोक्त नुसार वाढीव कामे, कामाचे मुळ गुत्तेदार काझी मुबारीजोद्यीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.हर्सुल येथे मनपा क्वॉर्टर जवळ व्यायामशाळा बांधणेच्या कामामध्ये, स.सदस्य श्री.पुनमचंद बमने यांनी Tandur फरशी ऐवजी Vetrified Tiles, बॉक्स टाईप विंडो व समोरील भागात पेव्हींग ब्लॉक बसविण्याची सुचना केल्यानुसार सदरील बाबींमुळे कामामध्ये एकुण रू.३.०० लक्ष ची वाढ होत असल्याने वाढीव कामे, कामाचे मुळ गुत्तेदार काझी मुबारीजोद्यीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३४ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.८० संतोषी माता नगर येथे नाल्यावर पुल बांधणेच्या कामासाठी सन २००६-०७ चे सा.बां. खात्याचे जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.८,९९,५९५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्त यांनी दि.३१/१०/०७ अन्वये मंजुरी दिली आहे.

सदर काम हाती घेण्यासाठी इ-निविदा मार्फत वर्तमानपत्रात जाहिरातीद्वारे बी-१ निविदा मागविल्या असता सर्वात कमी दराची व अं.प.दरापेक्षा ३१.१% जास्त दराची मे.संधु कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. सदरील दर जास्त वाटत असल्याने मक्तेदारास दर पृथःकरण सादर करण्यासाठी कार्यालयीन पत्र दिले असता मक्तेदाराने बाजारात बऱ्याच वस्तुंचे भाव वाढल्यामुळे सदरील काम ३१.१% जास्त दराने मिळावे म्हणुन विनंतजी केली होती. सदरील कामाचे दर सन २००७-०८ चे दरसूचीनुसार तुलना केली असता सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.८०% नी वाढ होते. त्यानुसार मक्तेदारास सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.१% जास्त ऐवजी १४.८०% जास्त दराने काम करण्याबाबत कळविले असता मक्तेदाराने सदरील काम १४.८०% जास्त दराने करण्यास लेखी संमती दर्शविलेली असून त्यास मा.आयुक्त यांनी दि.२२/१०/२००८ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच निविदाचे जास्त भरलेले दर व दर पृथःकरण प्रमाणे १४.८०% जास्त दरामुळे येणारा वाढीव खर्च रू.१,३३,१४०/- येत आहे. असे एकुण खर्च रू.१०,३२,७३५/- अपेक्षीत आहे.

सदरचा खर्च नविन खडी रस्ते व कल्व्हर्ट (डब्ल्यु १४४ अ.क्र.८ रू.४.०० लाख आणि मा.सर्वसाधारण सभा वळती तरतुद डब्ल्यु २१३ अ.क्र.३५ रू.५.०० लाख असे एकुण (९.००) लाख मधुन करण्यात येईल.

सबब सदर कामासाठी मे.संधु कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.१% जास्त ऐवजी १४.८०% जास्त दराची निविदा मंजुरीचा व वाढीव रक्कमेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८० संतोषी माता नगर येथे नाल्यावर पुल बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे सदरील काम मे.संधु कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.१% जास्त ऐवजी १४.८०% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३५ :**

रमानगर येथील बौध्द समाज स्मशान भुमीच्या जागेबाबत मा. जिल्हा न्यायालयाने दिवाणी दावा क्र.आरसीएस ९८१/९७ नुसार श्री.एस.जी.एम.सलीम घौरी यांची मालकी असून या जागेत प्रतिबंध करण्यासाठी मनाई हुकुम दिला आहे. या प्रकरणातील मनपाचे वकील श्री.अशोक अदवंत यांनी व विधी सल्लागार यांनी या प्रकरणात कायदेशीर अभिप्राय दिला आहे. श्री.एस.जी.एम.सलीम हे सर्वे नं.५५/सिटीएस नं.१४८१२ (क्षेत्रफळ १.०० एकर) या जागेच्या मोबदल्यासाठी कायदेशीर हक्कदार असल्याचे विधीज्ञांचे मत आहे. संबंधीतास रोख स्वरूपात अथवा टीडीआर (विकास हक्क हस्तांतरण) प्रमाणपत्राचे स्वरूपात मोबदला द्यावयाचा याचा निर्णय तडजोडीनंतर प्रशासनाने घ्यावा व सदरची जागा कायदेशीरपणे व रितसर महानगरपालिकेच्या ताब्यात घेता येईल.

त्याआधारे श्री. श्री.एस.जी.एम.सलीम घौरी यांनी सादर केलेल्या निवेदनानुसार रमानगर येथील बौध्द समाज स्मशान भुमीच्या जागेच्या वादाबाबत तडजोडीने स्थायी समितीमध्ये, मुंबई प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४८१ चे उपकलम १ मधील 'ह'

नुसार तडजोड करून मा.न्यायालयाची कार्यवाही तडजोडीने मिटविण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : संजय जोशी अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रमानगर येथील बौध्द समाज स्मशान भुमीच्या जागेबाबत मा. जिल्हा न्यायालयाने दिवाणी दावा क्र.आरसीएस ९८१/९७ नुसार श्री.एस.जी.एम.सलीम घौरी यांची मालकी हक्काबाबतचे प्रकरणातील मनपाचे वकील श्री.अशोक अदवंत यांनी व विधी सल्लागार यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार श्री.एस.जी.एम.सलीम हे सर्वे नं.५५/सिटीएस नं.१४८१२ (क्षेत्रफळ १.०० एकर) या जागेच्या मोबदल्यासाठी कायदेशीर हक्कदार असल्याचे विधीज्ञांचे मत असून, सदरची जागा कायदेशीरपणे व रितसर महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यासाठी, श्री. श्री.एस.जी.एम.सलीम घौरी यांनी सादर केलेल्या निवेदनानुसार रमानगर येथील बौध्द समाज स्मशान भुमीच्या जागेच्या वादाबाबत, मुंबई प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४८१ चे उपकलम १ मधील 'ह' नुसार तडजोड करून मा.न्यायालयाची कार्यवाही तडजोडीने मिटविण्यास मंजुरी देण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"राष्ट्रगीता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद